ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 31 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

बद्रीनाथहून परतताना हेलिकॉप्टर अपघातात पोलीस निरीक्षक साळुंखे यांच्यासह 6 जणांचा मृत्यू

पान 3 वरुन...

भोसरी-दिघी रस्त्याला टॉवरचा अडथळा!

निवडणूक आयोगाचा महत्त्वपूर्ण निर्णय; ३० नोव्हेंबरला अंतिम मतदार यादी

SIR प्रक्रियेला मुदतवाढ!

महाईन्यूज । मुंबई

राज्यात सुरू असलेल्या मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (SPECIAL INTENSIVE REVISION – SIR) प्रक्रियेला भारत निवडणूक आयोगाने मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, नावातील चुका दुरुस्त करणे तसेच चुकीच्या नोंदींबाबत हरकत नोंदवणे यासाठी नागरिकांना आणखी एक संधी उपलब्ध झाली आहे. महाराष्ट्रात दावे आणि हरकती दाखल करण्याची मुदत आता १३ नोव्हेंबर २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. यापूर्वी ही मुदत २६ ऑक्टोबरपर्यंत होती. विशेष म्हणजे, या निर्णयामुळे यापूर्वीच्या मुदतीत अर्ज दाखल करू न शकलेल्या पात्र नागरिकांनाही दिलासा मिळणार आहे.

महाराष्ट्रासह दिल्ली, आंध्र प्रदेश, हरियाणा, तेलंगणा आणि नागालँड या सहा राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये निवडणूक आयोगाने विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. संबंधित राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या विनंत्यांनंतर आयोगाने हा निर्णय घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

सहा राज्यांच्या मतदार यादीचे वेळापत्रक बदलले

निवडणूक आयोगाने केवळ महाराष्ट्रापुरताच नव्हे, तर अन्य पाच राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशातील पुनरीक्षण प्रक्रियेचे वेळापत्रकही सुधारित केले आहे. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, हरियाणा, तेलंगणा आणि नागालँड या पाच राज्यांमध्ये अंतिम मतदार यादी ३० नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध होणार आहे. तर दिल्लीमध्ये दावे आणि हरकती दाखल करण्याची मुदत २५ नोव्हेंबरपर्यंत वाढवण्यात आली असून, तेथील अंतिम मतदार यादी २२ डिसेंबरला प्रसिद्ध होणार आहे.

मतदारांनी नेमके काय करावे?

मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र नागरिकांना नाव समाविष्ट करण्यासाठी नमुना क्रमांक ६ (FORM 6) भरता येणार आहे. मतदार यादीतील चुकीच्या नोंदी, नाव, पत्ता किंवा अन्य तपशीलांमध्ये दुरुस्ती करण्यासाठी नमुना क्रमांक ८ (FORM 8) वापरता येईल. तसेच एखाद्या नोंदीबाबत हरकत किंवा नाव वगळण्यासंदर्भातील अर्जासाठी नमुना क्रमांक ७ (FORM 7) वापरला जातो. नागरिकांना निवडणूक आयोगाच्या अधिकृत मतदार सेवा पोर्टलवरून ऑनलाइन अर्ज करता येईल. तसेच संबंधित मतदार नोंदणी अधिकारी (ERO), सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (AERO) किंवा नियुक्त बूथस्तरीय अधिकारी (BLO) यांच्याशी संपर्क साधूनही आवश्यक प्रक्रिया पूर्ण करता येईल.

पात्र मतदारांचे नाव वगळले जाणार नाही, यासाठी दक्षता आवश्यक

मतदार यादीचे पुनरीक्षण ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून प्रत्येक पात्र नागरिकाच्या मतदानाच्या मूलभूत अधिकाराशी संबंधित महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे कोणत्याही पात्र मतदाराचे नाव यादीतून वगळले जाणार नाही, यासाठी नागरिकांनी स्वतःच्या नावाची पडताळणी करणे आवश्यक आहे. नाव नसल्यास निर्धारित मुदतीत अर्ज करणे, चुकीच्या नोंदी असल्यास दुरुस्ती करून घेणे आणि आवश्यक कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे.निवडणूक आयोगाच्या या निर्णयामुळे महाराष्ट्रातील मतदारांना आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करून घेण्यासाठी आणि नोंदी दुरुस्त करण्यासाठी अतिरिक्त कालावधी मिळाला आहे. त्यामुळे नागरिकांनी १३ नोव्हेंबरची अंतिम मुदत लक्षात घेऊन वेळेत प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.



२५ नोव्हेंबरपर्यंत दावे -हरकतींचा निपटारा

महाराष्ट्रातील सुधारित वेळापत्रकानुसार, नागरिकांना दावे आणि हरकती दाखल करण्यासाठी १३ नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी, आवश्यक नोटीस प्रक्रिया आणि दावे-हरकतींचा निपटारा करण्याची प्रक्रिया २५ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतर ३० नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्याचे नियोजन आहे. यापूर्वी दावे आणि हरकतींचा निपटारा करण्यासाठी १० नोव्हेंबरपर्यंतची मुदत निश्चित करण्यात आली होती. मात्र, सुधारित वेळापत्रकामुळे नागरिकांचे अर्ज तपासण्यासाठी तसेच आवश्यक पडताळणी आणि सुनावणी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्रशासनाला अधिक वेळ मिळणार आहे.

३० लाखांचा दरोडा पोलिसांनी दाखवली 'बॅग चोरी'

दरोड्याचा एफआयआर तब्बल २० दिवसांनी दाखल; अखेर वरिष्ठ अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई

महाईन्यूज । पुणे

मार्केट यार्ड परिसरात दिवसाढवळ्या ३० लाख रुपयांच्या रोकड रकमेवर दरोडा पडल्याची गंभीर घटना घडली असतानाही, या प्रकरणाची नोंद दरोड्याऐवजी बॅग हरवल्याची घटना म्हणून केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी मार्केट यार्ड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत जगताप यांना निलंबित केले आहे. दरोड्याच्या घटनेनंतर तब्बल २० दिवसांनी गुन्हा दाखल झाल्याने पोलीस यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना ७ ऑक्टोबर रोजी दुपारी मार्केट यार्ड परिसरातील शिवनेरी रस्त्यावर घडली. श्रवण देवासी (वय २२) आणि गणपत देवासी (वय १८) हे दोघे एका खासगी कंपनीत कामाला आहेत. कंपनीच्या कामानिमित्त ते दुचाकीवरून ३० लाख रुपये रोख रक्कम असलेली बॅग घेऊन जात होते.

दुपारी सव्वा एकच्या सुमारास दोन मोटारसायकलींवरून आलेल्या पाच जणांनी त्यांची दुचाकी अडवली. त्यानंतर आरोपींनी दोघांच्या चेहऱ्यावर स्प्रे सदृश पदार्थ फवारला. या प्रकारामुळे दोघे गोंधळून गेले असताना आरोपींनी त्यांच्या ताब्यातील रोकड असलेली बॅग हिसकावून घेतली आणि घटनास्थळावरून पळ काढला.

या अचानक घडलेल्या प्रकारामुळे दोन्ही कर्मचारी घाबरले. त्यांनी तत्काळ आपल्या मालकाला घटनेची माहिती दिली. त्यानंतर मालक राकेश परिहारिया यांनी पोलिसांशी संपर्क साधून घडलेला प्रकार कळविला. दिवसाढवळ्या एवढ्या मोठ्या रकमेची लूट झाल्याने परिसरात खळबळ उडाली होती. घटनेची माहिती मिळाल्यानंतर मार्केट यार्ड पोलिसांनी प्राथमिक चौकशी सुरू केली. मात्र, पीडित कर्मचाऱ्यांनी तक्रार देऊनही दरोड्याचा गुन्हा तत्काळ दाखल करण्यात आला नसल्याचे समोर आले आहे. त्याऐवजी ९ ऑक्टोबर रोजी बॅग हरवल्याची नोंद करण्यात आली.

तपासातून दरोड्याचा उलगडा

स्वारगेट पोलीस ठाण्याचे पथक सॅलिसबरी पार्क परिसरात एका व्यावसायिकासोबत घडलेल्या दरोड्याच्या घटनेचा तपास करीत होते. या तपासादरम्यान पोलिसांनी दोन संशयितांना अटक केली. त्यांची चौकशी सुरू असताना मार्केट यार्ड परिसरात ७ ऑक्टोबर रोजी ३० लाख रुपयांची रोकड लुटल्याच्या घटनेत सहभाग असल्याची कबुली त्यांनी दिल्याचे वृत्त आहे. एका पोलीस ठाण्यात केवळ बॅग हरवल्याची नोंद असताना दुसऱ्या गुन्ह्याच्या तपासातून दरोड्याचा प्रकार समोर आल्याने तपास यंत्रणांच्या कार्यपद्धतीबाबत चर्चा सुरू झाली.

ठाकरे बंधूंसोबत बंद खोलीत बैठक? मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्टच सांगितलं

महाईन्यूज । पुणे

मुंबईत गुरुवारी पार पडलेल्या 'महाराष्ट्राची हास्यरेषा' या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे तिघे एकाच व्यासपीठावर आल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले होते. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व चर्चांना पूर्णविराम देत तिघांमध्ये कोणतीही राजकीय चर्चा झाली नसल्याचे स्पष्ट केले आहे. पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलताना फडणवीस यांनी या कार्यक्रमामागील भूमिका स्पष्ट केली.

'महाराष्ट्राची हास्यरेषा' हा अतिशय छान कार्यक्रम होता. महाराष्ट्रातील गेल्या शंभर वर्षांतील ७५ व्यंगचित्रकारांवर आधारित पुस्तकाच्या प्रकाशनासाठी आपण एकत्र आलो होतो. या कार्यक्रमाला कोणताही राजकीय अर्थ लावू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'महाराष्ट्राची हास्यरेषा' या कार्यक्रमातून महाराष्ट्राच्या समृद्ध व्यंगचित्र परंपरेचे दर्शन घडले. महाराष्ट्रातील शंभर वर्षांतील ७५ व्यंगचित्रकारांचा प्रवास मांडणाऱ्या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी राज ठाकरे, उद्धव ठाकरे आणि आपण उपस्थित होतो. या कार्यक्रमाला आम्ही साहित्यप्रेमी म्हणून गेलो होतो. राजकीय विचारांमध्ये अंतर असू शकते. राजकीय पातळीवर एकमेकांवर टीकाही होत असते. मात्र अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून महाराष्ट्राची संस्कृती दिसून येते. हीच संस्कृती महाराष्ट्राला अपेक्षित आहे आणि लोकांनाही अशा प्रकारचे कार्यक्रम आवडतात, असे फडणवीस यांनी सांगितले.

राज ठाकरे, उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस या तिघांमध्ये बंद खोलीत बैठक झाल्याच्या चर्चाही सुरू होत्या. मात्र, फडणवीस यांनी हा दावा फेटाळला. आमची बंद खोलीत कोणतीही बैठक झाली नाही, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या मंचावर जाण्यापूर्वी आपण, राज ठाकरे, उद्धव ठाकरे आणि तेथे उपस्थित असलेले व्यंगचित्रकार वेटिंग रूममध्ये एकत्र बसलो होतो. कार्यक्रमाची वेळ झाल्यानंतर सर्वजण मंचावर आले. त्या ठिकाणी कोणतीही राजकीय चर्चा झाली नाही, तर केवळ हलकीफुलकी चर्चा झाली, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले. त्यामुळे या कार्यक्रमातील भेटीचा राजकीय अर्थ काढणे योग्य ठरणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राजकीय मतभेद असले तरीही सांस्कृतिक व्यासपीठावर एकत्र येणे ही महाराष्ट्राची परंपरा असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. भविष्यातही अशा प्रकारचे कार्यक्रम होतील आणि लोकांना ते आवडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. एकूणच, राज ठाकरे, उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीमुळे राजकीय चर्चांना उधाण आले असले, तरी मुख्यमंत्र्यांनी बंद खोलीतील बैठक आणि राजकीय चर्चेचा दावा फेटाळला आहे.

भोसरी-दिघी रस्त्याला टॉवरचा अडथळा!

टॉवर क्र. १७ स्थलांतरासाठी महापारेषणला आमदार लांडगे यांचे पत्र

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

भोसरी-दिघी मुख्य रस्त्याच्या मध्यभागी असलेला २२० के.व्ही. अतिउच्च दाब विद्युत वाहिनीचा मनोरा (टॉवर क्र. १७) वाहनचालकांसाठी धोकादायक ठरत असल्याने तो तातडीने स्थलांतरित करण्यात यावा, अशी आग्रही मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण) पुणे विभागाच्या मुख्य अभियंत्यांना पत्र पाठवून तातडीने कार्यवाही करण्याची सूचना केली आहे.



> “भोसरी-दिघी रस्त्याचे काँक्रिटीकरण बहुतांश पूर्ण झाले आहे. मात्र, रस्त्याच्या मध्यभागी असलेला अतिउच्च दाब विद्युत मनोरा वाहनचालकांसाठी धोकादायक ठरत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित या प्रश्नावर प्रशासकीय दिरंगाई स्वीकारार्ह नाही. महापारेषण आणि महापालिका प्रशासनाने संयुक्त समन्वयातून तांत्रिक व आर्थिक प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. टॉवर क्र. १७ स्थलांतरासाठी निश्चित कालमर्यादा ठरवून प्रत्यक्ष काम सुरू करावे, अशी अपेक्षा आहे.”
>
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

भोसरी-दिघी हा अत्यंत महत्त्वाचा आणि वर्दळीचा रस्ता आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत या रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण केले असून, बहुतांश काम पूर्णत्वास आले आहे. मात्र, रस्त्याच्या मध्यभागी असलेला महापारेषणचा अतिउच्च दाब विद्युत मनोरा अद्याप स्थलांतरित केलेला नाही. परिणामी, कोट्यवधी रुपये खर्चून विकसित करण्यात येत असलेल्या रस्त्यावरील वाहतूक सुरळीत होण्यात अडथळा निर्माण होत असल्याचा मुद्दा आमदार लांडगे यांनी उपस्थित केला आहे.

विशेषतः दुचाकीस्वार, चारचाकी वाहनचालक आणि अवजड वाहनांसाठी हा मनोरा धोकादायक ठरू शकतो. रस्त्याचे काँक्रिटीकरण पूर्ण होत आले असतानाही मध्यभागी असलेल्या मनोऱ्यामुळे वाहतुकीची कोंडी आणि संभाव्य अपघाताचा प्रश्न कायम आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मनोरा स्थलांतराचा विषय प्राधान्याने मार्गी लावणे आवश्यक असल्याचे आमदार लांडगे यांनी पत्रात नमूद केले आहे.

या मनोऱ्याच्या स्थलांतरासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत विभागाने महापारेषण प्रशासनाशी यापूर्वी पत्रव्यवहार केला आहे. मात्र, अद्याप या प्रक्रियेला अपेक्षित गती मिळालेली नाही. प्रशासकीय पत्रव्यवहार आणि विभागीय समन्वयाच्या अभावामुळे नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागणे योग्य नसल्याचे आमदार लांडगे यांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, महापारेषण आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांची तातडीने संयुक्त बैठक आयोजित करावी. टॉवर क्र. १७ च्या स्थलांतरासाठी आवश्यक तांत्रिक सर्वेक्षण, खर्चाचे अंदाजपत्रक, प्रशासकीय मान्यता आणि आर्थिक तरतुदीची प्रक्रिया निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावी. तसेच, प्रत्यक्ष काम सुरू करण्यासाठी कालबद्ध कृती आराखडा तयार करावा, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी केली आहे.

भोसरी-दिघी रस्त्यावरील वाहतूक सुरक्षित आणि सुरळीत होण्यासाठी विद्युत मनोऱ्याचे स्थलांतर विनाविलंब पूर्ण करणे गरजेचे आहे. नागरिकांच्या जीविताशी संबंधित या प्रश्नावर अधिक विलंब होऊ नये, यासाठी महापारेषण प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी भूमिका आमदार लांडगे यांनी मांडली आहे.

टॉवरमुळे अपघाताचा धोका!

भोसरी-दिघी रस्त्याचे काँक्रिटीकरण पूर्णत्वाकडे जात असताना मध्यभागी असलेला २२० के.व्ही. विद्युत मनोरा वाहतुकीसाठी अडथळा ठरत आहे. दुचाकी, चारचाकी आणि अवजड वाहनांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा मनोरा स्थलांतरित करणे आवश्यक आहे. यासाठी महापारेषणने महापालिकेशी समन्वय साधून तांत्रिक आणि प्रशासकीय प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. कामात आणखी विलंब न करता स्थलांतराची निश्चित तारीख जाहीर करावी, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.

पाणीपट्टी महापालिकेची, टँकरचा खर्च नागरिकांचा!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

शहरातील गृहनिर्माण सोसायट्यांना अपुरा पाणीपुरवठा आणि टँकरवरील वाढत्या खर्चाचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेने पाण्याची उपलब्धता आणि वितरणाचा प्रभागनिहाय हिशेब नागरिकांसमोर मांडावा. संपूर्ण पाणी विभागाची श्वेतपत्रिका जाहीर करून कारभारात पारदर्शकता आणावी, अशी मागणी पिंपरी-चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्था महासंघाने (पीसीसीएचएसएफ) केली आहे.

> “नागरिक पाणीपट्टी भरतात; त्यांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा मिळालाच पाहिजे. महापालिकेने पाणी विभागाची श्वेतपत्रिका जाहीर करून प्रभागनिहाय पाण्याची उपलब्धता, वितरण आणि तफावतीचा हिशेब सार्वजनिक करावा. पाणीपुरवठ्यातील त्रुटी दूर करण्यासाठी कालबद्ध उपाययोजना कराव्यात. पारदर्शक कारभार आणि नागरिकांच्या हक्काच्या पाण्यासाठी फेडरेशन सातत्याने पाठपुरावा करेल. याबाबत मुख्यमंत्री कार्यालय आणि जिल्हाधिकारी प्रशासनाकडे तक्रार करण्यात येणार आहे. शहरातील ३४ सोसायट्यांच्या लेखी पत्रावर संबंधित विभागाकडून ठोस कार्यवाही करावी, असा शेरा आयुक्तांनी दिलेला आहे. त्यामुळे निर्णयांना गती मिळेल, अशी अपेक्षा आहे.”
>
> - सचिन लोंढे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्था महासंघ.

पाणी विभागातील अधिकाऱ्यांवरील कारवाईच्या पार्श्वभूमीवर महासंघाने पाणीपुरवठा व्यवस्थेतील पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. नागरिकांना हक्काचे पाणी मिळण्यासाठी वितरण व्यवस्थेची वस्तुस्थिती समोर येणे आवश्यक असल्याची भूमिका महासंघाचे अध्यक्ष सचिन लोंढे यांनी मांडली.

प्रत्येक प्रभागासाठी किती पाणी उपलब्ध होते आणि प्रत्यक्षात किती पाण्याचे वितरण केले जाते, याची आकडेवारी सार्वजनिक करावी. उपलब्धता व वितरणातील तफावत, पाणीवाटपाचे नियोजन, त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि नागरिकांना मिळणाऱ्या पुरवठ्याची नियमितता यांचा स्पष्ट तपशील श्वेतपत्रिकेत असावा, अशी मागणी महासंघाने केली आहे.

पाणीवाटपाचा हिशेब द्या!

पाणीपट्टी भरूनही सोसायट्यांना टँकरचा खर्च करावा लागत आहे. महापालिकेने प्रभागनिहाय पाणीवाटपाची माहिती जाहीर करावी, अशी मागणी महासंघाने केली आहे.

अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने सोसायट्यांना टँकरसाठी अतिरिक्त खर्च करावा लागतो. त्यामुळे महापालिकेची पाणीपट्टी भरूनही रहिवाशांवर आर्थिक भार पडत असल्याचा मुद्दा महासंघाने उपस्थित केला. पाणीपुरवठ्यातील त्रुटी दूर करण्यासाठी ठोस उपाययोजना आणि त्यांच्या अंमलबजावणीची कालमर्यादा स्पष्ट करण्याची गरजही महासंघाने व्यक्त केली.

भूमिका

विधान परिषद निवडणुकीचे निकाल वरकरणी स्थानिक राजकारणापुरते मर्यादित वाटत असले, तरी त्यातून राज्यातील आणि देशातील राजकीय परिस्थितीचे वेगवेगळे पैलू समोर आले आहेत. विशेषतः काँग्रेसची कामगिरी आणि भाजपच्या राजकीय अपेक्षा यामुळे या निवडणुकांची चर्चा रंगली.

काँग्रेसचे देशभर शून्य, नागपुरात मात्र भाजपला धक्का!

देशातील बहुतांश ठिकाणी काँग्रेसला खातेही उघडता आले नाही. मात्र, महाराष्ट्राने या चित्राला अपवाद ठरवत काँग्रेसला विजयाची संधी दिली. त्यातही नागपूरमधील विजयाने भाजपच्या राजकीय वर्तुळात अस्वस्थता निर्माण केली.

विधान परिषद निवडणुका या मर्यादित मतदारसंख्येच्या आणि विशिष्ट राजकीय समीकरणांच्या आधारे लढवल्या जातात. त्यामुळे त्यांचे निकाल संपूर्ण जनमताचे प्रतिबिंब मानता येत नाही. तरीही प्रत्येक निवडणूक प्रतिष्ठेची करण्याची भाजपची रणनीती पाहता या निकालांना महत्त्व प्राप्त झाले आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागल्याने भाजपने या निकालांचा वापर विरोधकांवर टीका करण्यासाठी केला.

उत्तर प्रदेशात ११ जागांपैकी भाजपने सहा, तर समाजवादी पक्षाने पाच जागा जिंकल्या. काँग्रेसला येथे खातेही उघडता आले नाही. मात्र, भाजपच्या विजयाइतकेच समाजवादी पक्षाचे यश महत्त्वाचे आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अखिलेश यादव यांच्या पक्षाने भाजपला दिलेली टक्कर दुर्लक्षित करता येणार नाही. पंतप्रधानांनी काँग्रेसच्या अपयशावर भाष्य करताना समाजवादी पक्षाच्या यशाचीही दखल घेतली असती, तर राजकीयदृष्ट्या वेगळा संदेश गेला असता. बिहारमध्येही भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही. आठ जागांपैकी भाजपला तीन जागा मिळाल्या. जनता दल संयुक्त, जनसुराज आणि राजद यांनीही आपापले अस्तित्व दाखवून दिले. कर्नाटकात भाजपने तीन जागा जिंकल्या, तर काँग्रेसला एकही जागा मिळाली नाही. त्यामुळे काँग्रेसच्या संघटनात्मक ताकदीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मात्र, या निकालांमधून सत्ताधारी पक्षांसमोरील आव्हानेही स्पष्ट होतात.

महाराष्ट्रातील निकाल मात्र भाजपसाठी अधिक विचार करायला लावणारे आहेत. राज्यातील पाच जागांपैकी महाविकास आघाडीने तीन जागांवर विजय मिळवला, तर सत्ताधाऱ्यांना दोन जागांवर समाधान मानावे लागले. विशेष म्हणजे, राष्ट्रवादी काँग्रेसने शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली दोन ठिकाणी विजय मिळवून आपली राजकीय ताकद दाखवली. सत्ताधाऱ्यांकडे असलेली संघटनात्मक ताकद, यंत्रणा आणि राजकीय संसाधने पाहता हा निकाल महत्त्वाचा ठरतो. मात्र, सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला तो नागपूरमधील काँग्रेसचा विजय. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे नागपूर हे राजकीय केंद्र आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालयही याच शहरात आहे. अशा बालेकिल्ल्यात काँग्रेसने विजय मिळवणे ही भाजपसाठी आत्मपरीक्षणाची बाब आहे. देशभर काँग्रेसला शून्यावर रोखल्याचा आनंद व्यक्त करणाऱ्या भाजपला नागपूरने मात्र वेगळाच संदेश दिला.

निवडणुकीतील विजय-पराभव हे केवळ आकड्यांचे गणित नसते. त्यामागे स्थानिक नेतृत्व, कार्यकर्त्यांचे जाळे, मतदारांशी असलेला संपर्क आणि राजकीय विश्वासार्हता महत्त्वाची असते. त्यामुळे काँग्रेसचा देशभरातील पराभव जितका चर्चेचा विषय आहे, तितकाच नागपूरमधील विजयही महत्त्वाचा आहे. भाजपने विरोधकांच्या अपयशाचा आनंद साजरा करण्यापेक्षा स्वतःच्या बालेकिल्ल्यातील पराभवाची कारणे शोधणे अधिक गरजेचे आहे. अन्यथा, आजचा अपवाद उद्याचे राजकीय आव्हान ठरू शकतो.

प्रासंगिक »

यशाची खरी ओळख

एका गावात माधव नावाचा कुंभार राहत होता. त्याच्या हातून तयार होणारी मडकी बाजारात खूप प्रसिद्ध होती. एकदा राजवाड्यातून खास मडक्यांची मागणी आली. माधवने अनेक दिवस मेहनत घेऊन सुंदर मडकी तयार केली.

मात्र, ती पोहोचवण्यापूर्वी त्याचा मुलगा म्हणाला, “बाबा, राजवाड्यातील लोकांना आपले नाव कळले पाहिजे. प्रत्येक मडक्यावर आपली सही करा.”माधवने शांतपणे उत्तर दिले, “माझे नाव मडक्यावर असण्यापेक्षा ते वापरणाऱ्यांच्या मनात असणे महत्त्वाचे आहे.”

मडकी राजवाड्यात पोहोचली. काही दिवसांनी राजाने माधवला बोलावून घेतले. राजाने त्याच्या कामाचे कौतुक केले आणि विचारले, “तुझ्या कलेचे रहस्य काय?”

माधव म्हणाला, “महाराज, प्रत्येक मडके तयार करताना मी त्याचा उपयोग करणाऱ्या माणसाचा विचार करतो. त्यामुळे माझ्या कामात दिखावा नसतो, तर जबाबदारी असते.” राजाला त्याचे उत्तर खूप आवडले. त्याने माधवला सन्मानित केले.

- तात्पर्य : प्रसिद्धीपेक्षा कामातील प्रामाणिकपणा आणि गुणवत्तेला अधिक महत्त्व असते.

गुजरातमधील सुरत हे देशातील वस्त्रोद्योगाचे प्रमुख केंद्र असून, त्याच्या उभारणीत उत्तर प्रदेश, बिहार, ओडिशा आदी राज्यांतून आलेल्या स्थलांतरित कामगारांचा मोठा वाटा आहे. मात्र, याच कामगारांनी आता आपल्या हक्कांसाठी आवाज उठवत ‘गाव चलो’ अभियान सुरू केले आहे.

रोजगारासाठी शहरात, हक्कांसाठी गावाकडे!

आठ तास काम, आठवड्यातून एक दिवस सुट्टी आणि वेळेवर वेतन या मूलभूत मागण्यांसाठी सुरू झालेला संघर्ष आता व्यापक स्वरूप धारण करत आहे. कामगारांनी मोठ्या संख्येने गावाकडे परतण्याचा निर्णय घेतल्याने वस्त्रोद्योगासमोरही मनुष्यबळाचे संकट उभे राहण्याची शक्यता आहे.

सुरतमधील वस्त्रोद्योग मालकांच्या प्रतिनिधींनी कामगारांसमोर वेतनाचे दोन पर्याय ठेवले आहेत. पहिल्या पर्यायात आठ तासांची शिफ्ट, साप्ताहिक सुट्टी आणि १४ हजार ३०० रुपये मासिक वेतन, तर दुसऱ्या पर्यायात १२ तास कामासाठी ३५ हजार रुपये वेतन आणि अन्य सुविधा देण्याचा प्रस्ताव आहे. मात्र, या पर्यायांमुळे कामगारांसमोर मूलभूत प्रश्न निर्माण झाला आहे. अधिक उत्पन्नासाठी आरोग्य आणि कुटुंबासाठीचा वेळ गमवायचा की कमी वेतनावर आठ तास काम करायचे? वास्तविक, योग्य वेतन आणि मर्यादित कामाचे तास या दोन्ही गोष्टी कामगारांचे हक्क आहेत. एका सुविधेसाठी दुसऱ्या हक्काचा त्याग करण्याची वेळ त्यांच्यावर येणे

अन्यायकारक आहे.

उद्योगांच्या उत्पादनखर्चाचा आणि बाजारातील स्पर्धेचा विचार नक्कीच महत्त्वाचा आहे. मात्र, उद्योगाची भरभराट कामगारांच्या शारीरिक आणि मानसिक शोषणावर अवलंबून असू नये. कामगार हे केवळ उत्पादनाचे साधन नसून औद्योगिक विकासाचे महत्त्वाचे भागीदार आहेत. त्यांच्या श्रमाला योग्य मोबदला, सुरक्षित वातावरण आणि सन्मान मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे कारखानदार आणि कामगार प्रतिनिधींनी सामंजस्याने तोडगा काढणे गरजेचे आहे. ‘गाव चलो’ अभियान हे केवळ कामगारांचे स्थलांतर नसून त्यांच्या सामूहिक असंतोषाचे प्रतीक आहे. वेगवेगळ्या राज्यांतून आलेले, भाषा आणि संस्कृतीने वेगळे असलेले कामगार समान प्रश्नांसाठी एकत्र येत आहेत. ही बाब औद्योगिक क्षेत्रातील कामगार संघटनांच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. कामगारांच्या एकजुटीमुळे उद्योगांना त्यांच्या श्रमाचे महत्त्व नव्याने समजण्याची संधी निर्माण झाली आहे.

मात्र, कामगार गावाकडे परतले म्हणजे त्यांचे प्रश्न सुटले असे नाही. ग्रामीण भागात रोजगाराच्या मर्यादित संधी असल्यानेच ते शहरांकडे आले होते. शहरातील असुरक्षित रोजगार आणि गावातील बेरोजगारी या दोन्हींच्या कात्रीत त्यांचे आयुष्य अडकले आहे. त्यामुळे केवळ तात्पुरता तोडगा काढून चालणार नाही. ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती, शहरांमध्ये कामगार संरक्षण आणि उद्योगांमध्ये न्याय्य वेतनव्यवस्था या तिन्ही स्तरांवर धोरणात्मक बदल आवश्यक आहेत. अखेर उद्योगांची प्रगती ही कामगारांच्या श्रमावर उभी असते. त्यामुळे त्यांच्या हक्कांकडे दुर्लक्ष करून औद्योगिक विकासाचे स्वप्न साकार होऊ शकत नाही. कामगारांच्या श्रमाला सन्मान देणे ही उद्योगांची जबाबदारी आणि सरकारचे कर्तव्य आहे.

।। अभंगवाणी ।।

दुर्जनाची गंधी विष्ठेचिया परी ।
देखोनियां दुरी व्हावें तया ॥१॥

अइका हो तुम्ही मात हे सज्जन ।
करूं संघष्टन नये बोलों ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

लोकतंत्र वाचवा, अराजकता हटवा

घटनात्मक संस्थांवरील आरोपांविरोधात भाजपा नागपुरात काढणार मोर्चा

महाईन्यूज । मुंबई

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह देशातील संवैधानिक संस्थांविरोधात विरोधकांकडून करण्यात येणाऱ्या आरोपांच्या निषेधार्थ भाजपने रस्त्यावर उतरण्याची तयारी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात नागपुरात ५ नोव्हेंबर रोजी मोर्चाचे आयोजन करण्यात येणार आहे. यशवंत स्टेडियम ते व्हेरायटी चौक असा या मोर्चाचा मार्ग राहणार असून, त्यात १० हजारांहून अधिक कार्यकर्ते सहभागी होण्याची शक्यता आहे. नागपूर पदवीधर मतदारसंघातील पराभवानंतर कार्यकर्त्यांना परत सक्रिय करण्याचादेखील यामागे उद्देश असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

काँग्रेस व विरोधक खोटेनाटे आरोप करून देशात अराजकता पसरविण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप मुख्यमंत्र्यांपासून भाजपच्या अनेक नेत्यांनी केला. देशातील सद्य राजकीय परिस्थिती आणि संवैधानिक संस्थांबाबत उपस्थित करण्यात येणाऱ्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर भाजपने आक्रमक भूमिका घेण्याचे ठरविले आहे. त्याचाच भाग म्हणून नागपुरात मोठ्या मोर्चाचे नियोजन करण्यात आले आहे. 'लोकतंत्र वाचवा, अराजकता हटवा' असे नाव असलेल्या या मोर्चाच्या माध्यमातून विरोधकांकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संवैधानिक संस्थांना लक्ष्य करण्याच्या कथित प्रयत्नांना प्रत्युत्तर देण्याची भाजपची रणनीती आहे. ५ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता यशवंत स्टेडियम येथून मोर्चाला सुरुवात होणार असून, व्हेरायटी चौक येथे त्याचा समारोप होईल. या मोर्चात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे सहभागी होणार आहेत. याशिवाय शहरातील सर्व आमदार, खासदार, नगरसेवक, भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती राहणार आहे.

भाजपच्या या मोर्चाच्या माध्यमातून केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात विरोधकांकडून करण्यात येणाऱ्या आरोपांना जनतेसमोर उत्तर देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. लोकशाही व्यवस्था आणि संवैधानिक संस्थांच्या विश्वासार्हतेबाबत विरोधकांकडून उपस्थित करण्यात येणाऱ्या प्रश्नांवर भाजप आपली भूमिका मांडणार आहे. या मोर्चाद्वारे राज्यातील आणि देशातील जनतेपर्यंत भाजपचा संदेश पोहोचविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मोर्चाच्या आयोजनासाठी पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून तयारी सुरू असून, कार्यकर्त्यांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. नागपुरातील या आंदोलनाच्या माध्यमातून विरोधकांच्या भूमिकेवर राजकीय प्रत्युत्तर देण्याचा भाजपचा प्रयत्न असेल. दरम्यान, मोर्चाच्या पार्श्वभूमीवर नागपुरातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण करण्यावर पक्षाकडून भर दिला जात आहे. शहरातील विविध भागांतील पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी मोर्चात सहभागी व्हावे, यासाठी नियोजन केले जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीमुळे विशेष महत्त्व प्राप्त होणार आहे.

१० हजार कार्यकर्ते उतरणार

मोर्चाच्या माध्यमातून भाजप आपली संघटनात्मक ताकद दाखविण्यासोबतच विरोधकांच्या भूमिकेविरोधात जनमत तयार करण्याचा प्रयत्न करणार आहे. नागपुरातील भाजपच्या सर्व प्रमुख नेत्यांना आणि पदाधिकाऱ्यांना या मोर्चात सहभागी करून घेण्याचे नियोजन आहे. १० हजारांहून अधिक कार्यकर्ते मोर्चात आणण्याचे नियोजन पक्षाकडून करण्यात आले असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

राज्यातील दोन राखीव वनक्षेत्राना अभयारण्याचा दर्जा; १४ संवर्धन राखीव क्षेत्रे घोषित

महाईन्यूज । अहिल्यानगर

बागायती शेतजमीनीला जेथे ५० लाख रुपये एकर भाव सुरू आहे, तेथे रेडीरेकनरचा नियम दाखवत केंद्र सरकारने २३ लाख रुपये नुकसान भरपाई दिली. बागायतीला जिराईतीचा दर द्यायला हे सरकार निघाले आहे, शिवाय जमीन व मालमत्तेची रक्कम एकत्र देणे आवश्यक असताना, आधी फक्त जमिनीचे पैसे घ्या, नंतर मालमत्तेची देऊ,' अशी शेतकऱ्यांना लुटणारी शासनाची भूमिका असेल, तर, शेतकरी ते सहन करणार नाही, शेतकऱ्याच्या घरादारावर नांगर फिरवून महामार्ग होणार असेल, तर हा विकास काय कामाचा?,' असा संतप्त प्रश्न करत राहुरीतील शेतकऱ्यांनी भूसंपादनाची रक्कम नाकारली.

श्रीरामपूरच्या प्रांत कार्यालयात राहुरी तालुक्यातील सोनगाव परिसरातील पाच गावांतील शेतकऱ्यांना जमिनीच्या नुकसानभरपाईचे वाटप होणार होते. शेतकऱ्यांनी ते सामुहिकरित्या नाकारले. या महामार्गासंदर्भात नोव्हेंबर २०२१ मध्ये राष्ट्रीय रस्ते विकास प्राधिकरणाने अधिसूचना काढली. त्यानंतर शेतकऱ्यांच्या शेतजमिनी तसेच घरे, गोठा, शेड, विहीर, फळबागा याचे मूल्यांकन कृषी, महसूल, बांधकाम, वनविभागाने केले. प्रांताधिकाऱ्यांनी या मूल्यांकनाची तपासणी केली.

यात दोन वर्षे गेली. त्यानंतर २०२४ मध्ये भारतमाला योजना बंद झाल्यामुळे हा प्रकल्प थांबवला. शेतकऱ्यांच्या जमिनीवर 'एनएचआय'चा फेर पडल्यामुळे शेतकऱ्यांना कर्ज मिळणे मुश्कील झाले. प्रकल्प रखडल्याने जमिनीची खरेदी-विक्री करता येईना. २०२५ अखेर प्रकल्पाला पुन्हा गती मिळाली. २०२६ मध्ये महामार्गासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू झाली.

परंतु 'एनएचआय'ने आधी शेतकऱ्यांना केवळ जमिनीचे पैसे देण्याचे ठरवले. जमिनीवरील मालमत्तेचे पैसे पुन्हा तपासणी करून देऊ, असे सांगितले. ते शेतकऱ्यांना मान्य नाही. याचा निषेध करण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रांताधिकारी किरण सावंत यांना निवेदन दिले. सोनगावसह सात्रळ, कानडगाव, कनगर, वांबोरी आदी गावांतील शेकडो शेतकरी उपस्थित होते.

महामार्ग संघर्ष समितीचे अध्यक्ष गणेश अंत्रे म्हणाले, कुंभमेळ्यासाठी कोट्यवधी रुपये द्यायला सरकारकडे पैसे आहेत; इकडे शेतकऱ्याची काळी आई, घरदार उद्ध्वस्त करताना कवडीमोल भाव दिला जात आहे. शेतकऱ्यांच्या मुंडक्यावर पाय देऊन यांना विकास पाहिजे असेल, तर आम्ही तो होऊ देणार नाही.

नुकसान भरपाईपेक्षा विष द्या

आंदोलक निर्मला तुळशीराम अनाप म्हणाल्या, माझ्या पतीचे निधन झाले आहे. अवघी ३९ गुंठे शेती, त्यात सात गुंठे रस्त्यात जात आहेत. विंधन विहिर, विहीर, सायफन रस्त्यात गेले. नुकसानभरपाई अवघी चार लाखांची. मुला-मुलींच्या शिक्षणासाठी मी ३०० रु. रोजाने मी शेतात कामाला जाते. उरलेल्या वेळात शेती करते. आता विहीर, कुपनलिका गेल्यामुळे शेती करणार कशी? नुकसान भरपाईच्या नावाखाली सरकारने आमची थट्टा लावली आहे. या कवडीमोल पैशापेक्षा आम्हाला विष द्या.

जिनपिंग नंबर १ वर, पण चीनचा 'नंबर २'

फ्लाविियो बोल्सोनारो यांचा पराभव; लुला चौथ्यांदा राष्ट्राध्यक्ष होणार

महाईन्यूज । चीन

चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग हे संपूर्ण जगात आणि आपल्या देशात सर्वोच्च स्थानी असले, तरी त्यांच्याच ड्रॅगनच्या देशात आता एका नव्या आणि अत्यंत शक्तिशाली चेहऱ्याची जोरदार चर्चा रंगली आहे. जिनपिंग यांच्या खालोखाल चीनमध्ये दुसऱ्या क्रमांकाची ताकद म्हणून आता एकाच व्यक्तीचे नाव घेतले जात आहे.

ज्या देशाच्या राजकीय हालचालींवर संपूर्ण जगाचे लक्ष असते, त्या चीनमध्ये सध्या एका मोठ्या राजकीय आणि लष्करी घडामोडीने खळबळ उडवून दिली आहे. चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग हे देशातील सर्वोच्च नेते असले, तरी त्यांच्याच मंत्रिमंडळात आणि सैन्यात आता एका नव्या 'सुपर पॉवर'चा उदय झाला आहे. विशेष म्हणजे, या नेत्याच्या खांद्यावर चीनच्या लष्करापासून ते पक्षाच्या धोरणापर्यंत तब्बल तीन मोठ्या आणि अतिसंवेदनशील जबाबदाऱ्या आल्या आहेत. चीनच्या राजकारणात शी जिनपिंग यांच्याशिवाय आता ज्या नावाचा दरारा निर्माण झाला आहे, ते नाव आहे—झांग शेंगमिन. सध्याच्या घडीला झांग शेंगमिन हे चीनमधील एकमेव असे जनरल आहेत, ज्यांच्याकडे उपराष्ट्रपती दर्जा आणि थेट पॉलिटब्युरोचे सदस्यपद दोन्ही एकत्र आले आहे.

फेब्रुवारी १९५८मध्ये चीनच्या शान्शी प्रांतात जन्मलेले झांग शेंगमिन वयाच्या अवघ्या विशीत, म्हणजेच २०व्या वर्षी चिनी सैन्यात दाखल झाले होते. सुरुवातीला त्यांचे आयुष्य एकासामान्य सैनिकासारखेच होते, परंतु २०१० मध्ये आलेल्या एका भूकंपाच्या वेळी त्यांनी संभाळलेले भूकंप बचाव पथकाचे नेतृत्व त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारे ठरले.

ज्या वेळी २०१३ मध्ये शी जिनपिंग सत्तेच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचले, तेव्हापासून झांग शेंगमिन यांना सातत्याने मोठ्या जबाबदाऱ्या आणि बढत्या मिळत गेल्या. ते शी जिनपिंग यांचे अत्यंत निकटचे आणि विश्वासू सहकारी मानले जातात. चिनी सैन्यातून भ्रष्टाचार समूळ नष्ट करण्यासाठी जिनपिंग यांनी शिस्तपालन समितीच्या प्रमुखपदाची धुरा झांग यांच्याच हाती सोपवली होती.

भ्रष्टाचारविरोधी समितीचे अध्यक्ष असल्यामुळे झांग यांनी चिनी सैन्यात मोठा थरार उडवून दिला. गेल्या वर्षभरात सैन्यातील सातपैकी तब्बल पाच बड्या जनरल्सना त्यांच्या पदावरून थेट बडतर्फ करण्यात आले. एवढेच नाही तर, सैन्याचे उपाध्यक्ष असणाऱ्या झांग युशिया यांनाही याच प्रभावामुळे आपली नोकरी गमवावी लागली. या संपूर्ण कारवाईमुळे चिनी सैन्यात झांग शेंगमिन यांचा दरारा आणि धाक आणखी वाढला.

परंपरा मोडत थेट पॉलिटब्युरोत एन्ट्री!

चिनी राजकारणात आणि कम्युनिस्ट पक्षात एक जुनी परंपरा आहे. पक्षाच्या सर्वोच्च धोरणात्मक संस्था असलेल्या 'पॉलिटब्युरो'च्या सदस्यांची निवड नेहमी ठरलेल्या पक्ष अधिवेशनातच केली जाते. चीनचे पुढील अधिवेशन २०२७ मध्ये होणार आहे. मात्र, राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी ही सर्व परंपरा आणि प्रस्थापित कार्यपद्धती मोडीत काढत, थेट २०२५ मध्येच झांग शेंगमिन यांची पॉलिटब्युरोचे सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. या एकाच निर्णयाने संपूर्ण आंतरराष्ट्रीय राजकारणात खळबळ उडवून दिली.

स्पर्धा परीक्षा देणाऱ्यांसाठी मुख्यमंत्री विजय सरकारचा मोठा निर्णय

महाईन्यूज । तमिळनाडू

तमिळनाडू सरकारने विविध सरकारी पदांच्या थेट भरतीसाठी कमाल वयोमर्यादेत तब्बल पाच वर्षांची सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शुक्रवारी जाहीर केला. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या राज्यातील हजारो तरुणांची दीर्घकाळापासून प्रलंबित असलेली मागणी लक्षात घेऊन मुख्यमंत्री जोसेफ विजय यांनी हा निर्णय घेतला असल्याचे जाहीर केले.

कोणत्या पदांसाठी किती मर्यादा?

- **ग्रुप-१ सेवा (नागरी सेवा):** खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३२ वरून ३७ वर्षे करण्यात आली आहे, तर राखीव प्रवर्गासाठी ती ३७ वरून ४२ वर्षे करण्यात आली आहे.
- **ग्रुप-२ आणि २-अ सेवा:** खुल्या प्रवर्गासाठी वयोमर्यादा ३० वरून ३५ वर्षे करण्यात आली असून, राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी कोणतीही कमाल वयोमर्यादा असणार नाही.
- **ग्रुप-४ परीक्षा:** सर्वसाधारण उमेदवारांसाठी वयोमर्यादा ३२ वरून ३७ वर्षे करण्यात आली आहे.

शासनाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, ही सवलत इतर ओबीसी प्रवर्ग, अतिमागास प्रवर्ग, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती या घटकांसाठी आधीपासून लागू असलेल्या सवलतींव्यतिरिक्त लागू असेल. ही वाढीव वयोमर्यादा ३० ऑक्टोबर २०२६ पासून पुढील पाच वर्षांच्या कालावधीसाठी लागू राहील, असे सरकारने स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्रात शासन सेवेतील गट अ ते गट ड मधील विविध पदांवर नियुक्तीसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयोमर्यादा ३३ आणि मागासवर्गीयांसाठी ३८ वर्ष इतकी होती. मात्र ही वयोमर्यादा २५ एप्रिल २०१६ च्या शासन आदेशानुसार वाढविण्यात आली होती. आता खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा पाच वर्षांनी वाढवून ३८ वर्ष तर मागासवर्गीय उमेदवारांसाठीही पाच वर्षांची वाढ करून कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे करण्यात आली आहे.

तमिळनाडू आणि महाराष्ट्राची तुलना करायची झाल्यास राज्यातील उमेदवारांना एक वर्ष अधिक मिळत आहे. सत्तेवर आल्यापासून विजय यांच्या नेतृत्वाखालील सरकारने लोककल्याणकारी योजनांचा सपाटा लावला आहे. यापूर्वी सरकारने घरगुती ग्राहकांसाठी मोफत वीज मर्यादा दर दोन महिन्यांसाठी १०० युनिटवरून २०० युनिट केली आहे. याशिवाय महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष दल स्थापन करणे तसेच शाळा, धार्मिक स्थळे आणि गर्दीच्या ठिकाणांजवळ असणारी ७१७ सरकारी मद्यविक्री दुकाने बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने सहकारी बँकांचे ७५ हजार रुपयांपर्यंतचे पीककर्ज पूर्णपणे माफ केले असून १ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जावरही सवलत जाहीर केली आहे. या निर्णयाचा लाभ राज्यातील १३.३४ लाख शेतकऱ्यांना होणार आहे. याव्यतिरिक्त शासकीय रुग्णालयांत जन्मणाऱ्या प्रत्येक नवजात बालकाला १ ग्रॅमची सोन्याची अंगठी आणि पात्र तरुणींच्या विवाहासाठी आर्थिक साहाय्य देणाऱ्या योजनांचीही प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. विजय सरकारने १७ ऑगस्ट रोजी आपल्या कार्यकाळाचे १०० दिवस पूर्ण केले. त्यानिमित्त '१०० दिवसांचा कारभार – पिढ्या घडवणारे सरकार' हा प्रगती अहवाल सादर करत प्रशासनाने सुरुवातीच्या महिन्यांतील कामांचा आढावा जनतेसमोर मांडला होता.

दिशाची फॅशनविश्वातही जोरदार एन्ट्री

बॉलिवूड अभिनेत्री दिशा पटानी आपल्या बोल्ड लूक, ग्लॅमरस अंदाज आणि हटके फॅशन स्टाइलमुळे नेहमीच चर्चेत असते. तिच्या प्रत्येक लूकची सोशल मीडियावर चर्चा रंगते. मात्र, यावेळी दिशाने केवळ आपल्या सौंदर्याने किंवा अभिनयाने नव्हे, तर थेट व्यवसायविश्वात पाऊल ठेवत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. गेल्या दशकभरापासून चित्रपटांमधून चाहत्यांच्या मनावर राज्य करणाऱ्या दिशाने आता स्वतःचा 'DZ' हा कपड्यांचा ब्रँड लॉन्च केला आहे. विशेष म्हणजे, या ब्रँडच्या प्रमोशनसाठी तिने असा काही हटके अवतार धारण केला आहे की, तिचे फोटो आणि व्हिडीओ पाहून चाहतेही थक्क झाले आहेत. बॅगी आणि ओव्हरसाइज्ड कपडे, अंतराळ आणि एलियनपासून प्रेरित डिझाइन्स, त्यात ब्लिच केलेल्या भुवया आणि एकदम हटके लूक! दिशाचा हा नवा अवतार तिच्या नेहमीच्या ग्लॅमरस प्रतिमेपेक्षा खूपच वेगळा आहे. अभिनयासोबतच आता फॅशनच्या दुनियेतही स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी दिशा सज्ज झाली आहे. या कलेक्शनमध्ये सैलसर, बॅगी आणि ओव्हरसाइज्ड कपड्यांना प्राधान्य देण्यात आलं आहे. विशेष म्हणजे, अंतराळ आणि एलियनपासून प्रेरित ग्राफिक्स आणि वेगळ्या डिझाइन्स हे या ब्रँडचं प्रमुख आकर्षण आहे. दिशाला स्वतःलाही आरामदायी आणि हटके फॅशनची आवड आहे. त्यामुळे तिच्या याच आवडीचं प्रतिबिंब 'DZ'च्या कलेक्शनमध्ये पाहायला मिळत आहे. आपल्या वॉर्डरोबमध्ये काहीतरी वेगळं आणि प्रयोगशील आणू इच्छिणाऱ्या फॅशनप्रेमींसाठी हा ब्रँड आकर्षण ठरू शकतो.

श्रद्धा कपूरची मराठमोळी अदा

बॉलिवूडच्या ग्लॅमरस दुनियेत आपल्या अभिनयाने आणि सौंदर्याने चाहत्यांना भुरळ घालणारी अभिनेत्री श्रद्धा कपूर सध्या एका वेगळ्याच अंदाजामुळे चर्चेत आली आहे. यावेळी ना तिचा ग्लॅमरस लूक चर्चेत आहे, ना एखादा रोमँटिक सीन! तर चक्क मराठमोळा साज, पारंपरिक साडी, लावणीचा ठसका आणि फुगडीचा भन्नाट फेर! श्रद्धा कपूरच्या आगामी 'ईठा' चित्रपटाच्या ट्रेलर लाँच सोहळ्यात असंच काहीसं पाहायला मिळालं. मुंबईतील दादर येथील प्रसिद्ध प्लाझा थिएटरमध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमात श्रद्धाने विंटेज कारमधून खास अंदाजात एन्ट्री घेत चाहत्यांचं लक्ष वेधून घेतलं. तिच्या स्वागतासाठी उपस्थित असलेल्या अस्सल लावणी कलावंतांसोबत तिने मनमुराद आनंद लुटला. एवढंच नाही, तर एका लावणी कलावंताच्या आग्रहाखातर श्रद्धाने चक्क फुगडीचा फेर धरला. यावेळी श्रद्धानेही आपल्या नखरेल अदांनी आणि उत्साही स्वभावाने सर्वांची मनं जिंकली. एका लावणी कलावंताने तिला फुगडी घालण्याचा आग्रह केला. मग काय, श्रद्धानेही क्षणाचाही विलंब न करता तिच्यासोबत फुगडीचा फेर धरला. लावणी कलावंतांसोबतचा तिचा हा आनंदी क्षण कॅमेऱ्यात कैद झाला असून, सोशल मीडियावर चाहत्यांकडून या व्हिडीओचं कौतुक केलं जात आहे. श्रद्धा कपूरच्या 'ईठा' या चित्रपटाची घोषणा झाल्यापासूनच प्रेक्षकांमध्ये उत्सुकता आहे. या चित्रपटात श्रद्धा महाराष्ट्राच्या तमाशा आणि लावणी क्षेत्रातील दिग्गज कलावंत विठाबाई नारायणगावकर यांची भूमिका साकारताना दिसणार आहे. त्यामुळे या भूमिकेसाठी श्रद्धाने मराठी संस्कृती, लावणी आणि तमाशाच्या विश्वाशी जोडलेला खास अंदाज आत्मसात केला आहे. या चित्रपटात श्रद्धासोबत मोहम्मद झिशान अय्यूब, सिद्धार्थ जाधव आणि अनंत जोशी हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत. 'छावा' फेम दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. तर मॅडॉक फिल्म्सचे दिनेश विजन या चित्रपटाचे निर्माते आहेत.

थिएटरनंतर आता ओटीटीवर येणार 'मिर्झापूर'

राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक मधुर भांडारकर स्वत:च्या पुढील प्रोजेक्टवरून चर्चेत आहेत. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे जीवन आणि त्यांचा वारसा मोठ्या पडद्यावर आणण्याचे शिवधनुष्य ते पेलणार आहेत. या प्रोजेक्टचे संभाव्य नाव 'श्यामा-द मिसिंग चॅप्टर" ठेवण्यात आले आहे. या चित्रपटाचे चित्रिकरण पुढील वर्षी सुरु होऊ शकते. प्रोजेक्टशी निगडित इतर माहिती सध्या गुप्त ठेवण्यात आली आहे. या चित्रपटाच्या निर्मितीत आदित्य कुमार हलवासिया सहभागी आहेत. तर भांडारकर एंटरटेनमेंट आणि एकेएच वेंचर्सकडून याची निर्मिती केली जाणार आहे. भांडारकर स्वत:चा आगामी चित्रपट 'द वाइव्स ऑफ बॉलिवूड'चे काम पूर्ण केल्यावर या प्रोजेक्टवर काम सुरू करणार आहेत. ऐतिहासिक ड्रामा आणि पॉलिटिकल थ्रिलर असलेला हा चित्रपट डॉ. मुखजी यांच्या जीवनावर आधारित असेल. या चित्रपटाच्या कहाणीत कलकत्ता विद्यापीठातील सर्वात युवा कुलपतीच्या रुपात त्यांची प्रारंभिक कारकीर्द, जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वात स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांचा कार्यकाळ आणि अशा वैचारिक मतभेदांना सामील केले जाईल, ज्यामुळे त्यांनी राजीनामा दिला होता. हा चित्रपट 1951 मध्ये भारतीय जनसंघाची स्थापना, 1953मध्ये जम्मू-काश्मीरमध्ये 'परमिट सिस्टीम"च्या विरोधात त्यांचे अभियान आणि कोठडीत असताना त्यांच्या मृत्यूशी निगडित गोष्टींना दाखविणार आहे. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे जीवन पडद्यावर साकारणे मोठे आव्हान आहे. 'श्यामा"द्वारे भारताच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण अध्यायाला प्रामाणिक, संवेदनशीलता आणि एका नव्या दृष्टीकोनासोबत प्रेक्षकांसमोर आणू इच्छितो असे भांडारकर यांनी म्हटले आहे.

न्यूझीलंडचा भारतावर दणदणीत विजय!

गोलंदाजांनंतर फलंदाजांनी टेकले गुडघे; फिलिप्स-ब्रेसवेल-डफी ठरले मॅचविनर

महाईन्यूज । न्यूझीलंड

न्यूझीलंड संघाने चौथ्या टी-२० सामन्यात उत्कृष्ट कामगिरी करत भारताला पराभवाचा धक्का दिला आहे. न्यूझीलंड संघाने भारताचा धावांनी दारूण पराभव केला. ग्लेन फिलिप्स व मायकेल ब्रेसवल यांनी शतकी भागीदारी साकारली. तर फिलिप्सनेही शतक झळकावलं. त्यांच्या या खेळीच्या बळावर संघाने २५९ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरात भारताची फलंदाजी चांगळीच कोसळली आणि संघ फक्त १ धावा करू शकला.

प्रथम फलंदाजी करताना, न्यूझीलंडने २० षटकांत २५९ धावा केल्या. प्रत्युत्तरात, भारतीय संघ केवळ १७२ धावाच करू शकला, ज्यामुळे त्यांना ८७ धावांनी पराभव पत्करावा लागला. न्यूझीलंडच्या विजयाचा नायक ठरला ग्लेन फिलिप्स, ज्याने ४९ चेंडूंत १०७ धावा केल्या. याव्यतिरिक्त, मायकेल ब्रेसवेलने २५ चेंडूंत ६५ धावांची खेळी केली. या दोघांनी मिळून अवघ्या ४० चेंडूंत ११५ धावांची भागीदारी केली, ज्यामुळे भारतीय संघ पूर्णपणे सामन्यातून बाहेर फेकला गेला. गोलंदाजीमध्ये, जेकब डफीने उत्कृष्ट कामगिरी करत आपल्या ४ षटकांत २३ धावा देऊन ४ बळी मिळवले.

श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकताच न्यूझीलंड संघाला फलंदाजीसाठी पाचारण केलं आणि संघाने टी-२० इतिहासातील आपली सर्वात मोठी धावसंख्या उभारली. भारताने पहिल्याच षटकात टीम सायफर्टची विकेट घेत दणक्यात सुरूवात केली. त्यानंतरही संघाने विकेट्स गमावले खरे, पण ग्लेन फिलिप्स व मायकेल ब्रेसवेल यांनी भारताच्या गोलंदाजांची शाळा घेतली.

भारताची आक्रमक फलंदाजी फळी आज पूर्णपणे अपयशी ठरली. संजू सॅमसन सर्वात आधी बाद झाला; सॅमसन आणि इशान किशन दोघेही पहिल्याच षटकात बाद झाले, इशानला खातंही उघडता आलं नाही. अभिषेक शर्मा आणि कर्णधार श्रेयस अय्यर यांनी खेळपट्टीवर स्थिरावण्याचा प्रयत्न केला, परंतु पॉवरप्ले संपण्यापूर्वीच दोघेही बाद झाले. मॅथ्यू फिशरने २७ धावांवर अभिषेक शर्माला बाद केलं, तर ११ चेंडूंमध्ये २२ धावा करणारा कर्णधार श्रेयस अय्यर, ॲडम मिल्नेच्या गोलंदाजीवर त्रिफळाचीत झाला.

मधल्या षटकांमध्ये अक्षर पटेल ७ धावा काढून बाद झाला. नितीश कुमार रेड्डीने आक्रमक फलंदाजी करण्याचा प्रयत्न केला, परंतु २१ धावांवर तो सँटनरचा बळी ठरला. नमन धीरनेही जलद फलंदाजी करत १३ चेंडूंत २८ धावा केल्या, पण त्यानंतर तो जेकब डफीच्या गोलंदाजीवर बाद झाला. डावाच्या उत्तरार्धात उपकर्णधार तिलक वर्माने ३५ धावा करत प्रयत्न केला, तरीही भारताला या सामन्यात मोठ्या फरकाने पराभव पत्करावा लागला.

भारताच्या फलंदाजांपूर्वी गोलंदाजी विभागही फेल ठरला. न्यूझीलंड संघाने २० षटकांत २५९ धावा केल्या ही कोणत्याही संघाने भारताच्या विरोधात उभारलेली आतापर्यंतची सर्वोच्च धावसंख्या आहे. ग्लेन फिलिप्सच्या धडाकेबाज शतकाच्या बळावर न्यूझीलंडने हा टप्पा गाठला; त्याने १० षटकार आणि ४ चौकारांच्या मदतीने १०७ धावा केल्या. मायकेल ब्रेसवेलनेही मोलाचे योगदान देत अवघ्या २५ चेंडूत ६५ धावा फटकावल्या, ज्यामध्ये ६ षटकार आणि ४ चौकारांचा समावेश होता.

गोलंदाजांपैकी अक्षर पटेलने आपल्या ३ षटकांत ४३ धावा दिल्या. नितीश कुमार रेड्डीने ४ षटकांत ५४ धावा दिल्या. तर प्रिन्स यादवने ४९ धावा तर मयंक यादवने ४८ धावा दिल्या. तर अर्शदीपने ३८ धावा दिल्या.

अंडर-१९ आशिया चषकासाठी टीम इंडियाची घोषणा! द्रविड-सेहवागच्या मुलांवर लक्ष

महाईन्यूज । मुंबई

भारतीय क्रिकेटमधील दोन दिग्गज माजी फलंदाजांच्या मुलांना आता आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडण्याची संधी मिळणार आहे. कर्नाटकचा अन्वय द्रविड आणि दिल्लीचा आर्यवीर सेहवाग यांची शुक्रवारी एसीसी पुरुष अंडर-१९ आशिया चषकासाठी भारतीय संघात निवड झाली आहे. ५ ते १४ नोव्हेंबरदरम्यान ओमानमधील मस्कत येथे ही स्पर्धा खेळवली जाणार आहे. या स्पर्धेसाठी भारताचा १५ सदस्यीय संघ जाहीर करण्यात आला आहे.

भारताचा १९ वर्षांखालील आशिया चषकासाठी संघ

लक्ष्य रायचंदानी (कर्णधार), आर्यवीर सेहवाग, व्ही.के. विनीत, यशवर्धन सिंग चौहान (उपकर्णधार), कुशाग्र ओझा, अर्जुन राजपूत, मनाल चौहान, अन्वय द्रविड (यष्टीरक्षक), रजत बघेल (यष्टीरक्षक), व्ही. यशवीर, आर्यन सावसानी, मोहित उलवा, काव्य पटेल, शविन विनोद आणि इशान सूद.

अन्वय हा भारताचा माजी कर्णधार आणि मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडचा मुलगा आहे, तर आर्यवीर हा भारताचा माजी स्फोटक सलामीवीर वीरेंद्र सेहवागचा मुलगा आहे. नुकत्याच पार पडलेल्या विनू मांकड ट्रॉफीमधील दमदार कामगिरीच्या बळावर या दोघांनीही भारतीय संघात स्थान मिळवले आहे. या दोन्ही युवा फलंदाजांनी अंडर-१९ देशांतर्गत स्पर्धेत शतकं झळकावत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं होतं. त्यामुळे आगामी आशिया चषकाच्या निमित्ताने त्यांना आपली गुणवत्ता आंतरराष्ट्रीय स्तरावर दाखवण्याची मोठी संधी मिळणार आहे.

१७ वर्षीय अन्वय द्रविडने या स्पर्धेत विशेष छाप पाडली. ऑक्टोबरच्या सुरुवातीला गुजरातविरुद्ध खेळताना त्याने अवघ्या १०० चेंडूंत १५१ धावांची आक्रमक खेळी केली होती. विशेष म्हणजे, डावाच्या अखेरच्या षटकांमध्ये वेगाने धावा करवण्याची क्षमता त्याने आपल्या कामगिरीतून दाखवून दिली. विनू मांकड ट्रॉफीमध्ये त्याने सातत्याने प्रभावी खेळी करत भारतीय संघातील निवडीसाठी आपली दावेदारी मजबूत केली होती.

अन्वय द्रविडने यापूर्वीही आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडली आहे. यावर्षी जुलैमध्ये हंबनटोटा येथे श्रीलंकेविरुद्ध झालेल्या युवा एकदिवसीय सामन्यात त्याने अवघ्या ६७ चेंडूंत ८७ धावांची खेळी केली होती. या कामगिरीमुळे भारताच्या वयोगटातील संघातील प्रतिभावान फलंदाज म्हणून त्याची ओळख अधिक मजबूत झाली.

दुसरीकडे, आर्यवीर सेहवागनेही विनू मांकड ट्रॉफीमध्ये दमदार कामगिरी करत भारतीय संघातील आपलं स्थान निश्चित केलं. १९ वर्षीय आर्यवीरने विजयनगर येथे चंदीगडविरुद्ध झालेल्या सामन्यात १४३ चेंडूंत १७३ धावांची शानदार खेळी केली होती. मोठी खेळी उभारण्याची क्षमता त्याने या कामगिरीतून दाखवून दिली.

आगामी अंडर-१९ आशिया चषकात भारतीय संघाचं नेतृत्व लक्ष्य रायचंदानी करणार असून, यशवर्धन सिंह चौहानकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या संघात यष्टिरक्षक रजत बघेलसह अन्वय द्रविडचाही समावेश आहे. याशिवाय, फलंदाजीच्या पर्यायांमध्ये व्ही. के. विनीत, कुशाग्र ओझा आणि अर्जुन राजपूत यांनाही संधी देण्यात आली आहे.

आगामी अंडर-१९ आशिया चषकासाठी भारतीय संघाला पाकिस्तान, नेपाळ आणि संयुक्त अरब अमिराती (UAE) यांच्यासह ‘अ’ गटात स्थान देण्यात आलं आहे. भारत आपल्या मोहिमेची सुरुवात ६ नोव्हेंबर रोजी नेपाळविरुद्धच्या सामन्याने करणार आहे. त्यानंतर ८ नोव्हेंबरला भारताचा कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी सामना होईल. तर साखळी फेरीतील अखेरचा सामना १० नोव्हेंबरला संयुक्त अरब अमिरातीविरुद्ध खेळवण्यात येणार आहे. त्यामुळे भारताच्या युवा संघाला साखळी फेरीत पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यातही आपली ताकद दाखवण्याची संधी मिळणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

। शनिवार ।
दि. 31 ऑक्टोबर 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

अधिकारी, कर्मचाऱ्यांनी कोणत्याही भेटवस्तू स्वीकारू नयेत

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे कडक कारवाईचे परिपत्रक जारी

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने नागरिक, कंत्राटदार (ठेकेदार) अथवा कोणत्याही संस्थांकडून कोणत्याही प्रकारच्या भेटवस्तू किंवा देणग्या स्वीकारू नयेत, असे आदेश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत. याबाबत त्यांच्या स्वाक्षरीने परिपत्रक जारी करण्यात आले आहे. महापालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांनी नागरिक, कंत्राटदार अथवा कोणत्याही संस्थांकडून भेटवस्तू किंवा देणगी स्वीकारल्याचे आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध शिस्तभंगाची कडक कारवाई केली जाईल, असेही परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

प्रभावी आणि लोकाभिमुख प्रशासन व्यवस्थेसाठी प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्याने नियमांचे काटेकोरपणे पालन करणे हे प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याचे कर्तव्य आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील कलम १२ नुसार कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याने कोणतीही देणगी (भेटवस्तू) स्वतः स्वीकारता कामा नये किंवा त्याच्या कोणत्याही कुटुंबीयाला किंवा त्याच्या वतीने काम करणाऱ्या व्यक्तीला देणगी (भेटवस्तू) स्वीकारण्यास परवानगी देता कामा नये. तसेच, या कलमातील टिप-२ नुसार शासकीय कर्मचाऱ्याने त्याच्याशी कार्यालयीन व्यवहार असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून किंवा औद्योगिक किंवा वाणिज्यिक संस्थांकडून, संघटनांकडून वारंवार केला जाणारा पाहुणचार स्वीकारण्याचे टाळावे, असे स्पष्ट निर्देश दिलेले आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील कलम १२ या नियमाच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी नागरिक, ठेकेदार अथवा अन्य कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थांकडून भेटवस्तू (Gifts) किंवा देणग्या स्वीकारू नयेत. किंवा त्यांच्या कोणत्याही कुटुंबीयाला किंवा त्यांच्या वतीने काम करणाऱ्या व्यक्तीला देणगी किंवा भेटवस्तू स्वीकारण्यास परवानगी देऊ नये. तसेच, सुरक्षा विभागानेदेखील महापालिकेच्या कार्यालयात भेटवस्तू घेऊन येणाऱ्यांना कार्यालयात जाण्यापासून मज्जाव करावा. अशा प्रकारच्या देणग्या किंवा भेटवस्तू महापालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी स्वीकारल्याचे आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध शिस्तभंगाची कडक कारवाई केली जाईल, असेही परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

आंतरराष्ट्रीय अनुभव, जागतिक दर्जाचे कौशल्य महत्त्वाचे; डॉ. गोविंद कुलकर्णी

महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आंतरराष्ट्रीय अनुभव, शिक्षण आणि जागतिक दर्जाचे कौशल्य महत्त्वाचे आहे. जपान सारख्या प्रगत देशात देखील उद्योग खूप संधी आहेत. भारत आणि जपान यांच्यातील शैक्षणिक, औद्योगिक व सांस्कृतिक संबंध अधिक दृढ करणे आणि जपान मधील उच्च शिक्षण, संशोधन, उद्योग, व्यवसाय संधी बाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी जपानच्या मुंबईतील वाणिज्य दूतावासाच्या सहकार्याने पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग येथे आयोजित केलेला 'जपान ची ओळख २०२६' हा उपक्रम महत्त्वपूर्ण असल्याचे पीसीसीओई चे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी सांगितले.

यावेळी जेट्रो मुंबईचे महासंचालक हिसाशी मुराकामी, सहाय्यक संचालक नीलम भाटिया यांनी जपान मधील करिअरच्या विविध संधी तसेच भारतीय प्रतिभेला जपानी उद्योगांशी जोडण्यासाठी जेट्रो तर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच नोव्हेंबर २०२६ मध्ये पीसीसीओई येथे जपानी उद्योग विषयक विशेष परिसंवाद आयोजित करण्याची घोषणाही करण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांना जपानी उद्योग विश्वाशी संवाद साधण्यासाठी आणखी एक व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

पीसीसीओई च्या आंतरराष्ट्रीय संबंध विभाग आणि जपान सुविधा केंद्र यांच्या पुढाकारातून 'जपान ची ओळख २०२६' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचे हे पाचवे वर्ष होते. पुण्यातील विविध शैक्षणिक संस्थांमधील ५५० हून अधिक विद्यार्थ्यांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला होता. या कार्यक्रमात जपानची शिक्षण पद्धती, जपानी भाषा, औद्योगिक संस्कृती, तंत्रज्ञानातील प्रगती, रोजगाराच्या संधी आणि जागतिक स्तरावरील करिअरचे पर्याय याची माहिती देण्यात आली. तसेच उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय व्यावसायिक वातावरणाची प्रत्यक्ष ओळख करून घेता आली.

या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी शुभेच्छा दिल्या.

जपान फाउंडेशन, नवी दिल्लीच्या पश्चिम विभागातील जपानी भाषा शिक्षणाचे वरिष्ठ सल्लागार मकोतो सायतो, ॲस्टेमो एफआयई प्रा. लि.चे संचालक सुधीर गोगटे, जलताप, पुणे या संस्थेचे संस्थापक सदस्य डॉ. हरी दामले, डीजी फ्युचरटेक इंडिया प्रा. लि., पुणे चे मुख्य कार्यकारी अधिकारी गौतम कुलकर्णी, जपानी करिअर समुपदेशक व व्यावसायिक सल्लागार राजेंद्र जोशी, फिडेल सॉफ्टटेक लि.च्या उच्च तंत्रज्ञान उपाययोजना विभागाचे सहाय्यक उपाध्यक्ष दीपक जोशी यांनी देखील मार्गदर्शन केले व माहिती दिली. विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांशी संवाद साधता आला, नव्या संकल्पना समजून घेता आल्या आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक व औद्योगिक संधी बाबत मार्गदर्शन मिळाले.

स्वागत करताना पीसीसीओईच्या आंतरराष्ट्रीय संबंध विभागाच्या अधिष्ठाता डॉ. रोशनी राऊत यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनविण्याचा पीसीसीओई चा प्रयत्न आहे. येथे सातत्याने नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम, उद्योग प्रशिक्षण आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याला प्राधान्य दिले जाते. ‘जपान ची ओळख’ सारख्या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना जागतिक उद्योग विश्वाच्या गरजा, आंतर सांस्कृतिक संवाद, आधुनिक तंत्रज्ञान आणि आंतरराष्ट्रीय करिअरच्या संधी यांची ओळख करून देण्याचा प्रयत्न आहे. या उपक्रमामुळे आंतरराष्ट्रीय संबंध अधिक बळकट होऊन विद्यार्थ्यांच्या जागतिक स्पर्धात्मक क्षमता विकसित करण्यास चालना मिळते. आभार पीसीसीओईच्या आंतरराष्ट्रीय संबंध विभागाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांनी मानले. उपस्थितांनी विविध प्रदर्शने व स्टॉल्सना भेट देऊन संवाद साधला.

मानव संसाधन हे लोक आणि संस्कृतीशी संबंधित; चैत्राली पाटेकर

एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमध्ये 'आरंभ' चर्चासत्र संपन्न; तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना केले मार्गदर्शन

महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड

मानव संसाधन आणि मनुष्यबळ विकास हे क्षेत्र लोक आणि संस्कृतीशी संबंधित आहे. मानव संसाधन म्हणजे लोकांची काळजी घेणे. कोणतेही तंत्रज्ञान माणसांची जागा घेऊ शकत नाही, ते तुम्हाला फक्त डेटा देते. तंत्रज्ञान जीवन सुलभ करते, करिअर घडवण्यासाठी तंत्रज्ञान आवश्यक आहे त्यासाठी स्वतःला अद्ययावत ठेवा असे मार्गदर्शन पीपल अँड कल्चर अडोर पावरट्रोन च्या प्रमुख चैत्राली पाटेकर यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथे आयोजित केलेल्या 'आरंभ' या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी फोसेको हुयूम रिसोर्स डायरेक्टर प्राची संचाल, एसबीपीआयएम संचालक डॉ. कीर्ती धारवाडकर, ज्येष्ठ स्त्री रोग तज्ञ व आरोग्य संशोधक डॉ. वैजयंती पटवर्धन, जपानी भाषा संचालक डॉ. मानसी शिरगुरकर, शैक्षणिक प्रमुख रूपाली कुदरे आदी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्राची संचाल यांनी सांगितले की, आधुनिक कौशल्य, वचन बद्धता आणि करुणा या त्रिसूत्रीचा जीवनात अंगीकार करावा.

डॉ. वैजयंती पटवर्धन यांनी सांगितले की, महिलांचे अनेक सामाजिक प्रश्न आहेत. तसेच त्यांच्या मानसिक, आध्यात्मिक आणि शारीरिक समस्या असतात. त्याचा व्यावसायिक आणि वैयक्तिक जीवनात संबंध येतो. प्रत्येक महिलेच्या सुखी जीवनाचा पाया निरोगी, निरामय आरोग्य आहे.

मानसी शिरगुरकर यांनी सांगितले की, जपानमध्ये नोकरी किंवा व्यवसाय करायचा असेल तर जपानी भाषा, संस्कृती आणि जपानी ब्रँड बद्दल माहिती असणे आवश्यक आहे. तुम्हाला त्यांची भाषा समजून घ्यावी लागते.

सूत्रसंचालन डॉ. प्रणिता बुरबुरे, डॉ. ऐश्वर्या गोपालकृष्णन आणि आभार डॉ. योगेंद्र देवकर यांनी मानले.

Blood Donation Camp Marks D. Y. Patil Dada's Birth Anniversary

MahaEnews I PIMPRI-CHINCHWAD

Dr. D. Y. Patil Technical Campus organized a blood donation camp to commemorate the birth anniversary of the Late Padma Shri Dr. D. Y. Patil Dada. The event was conducted with great enthusiasm and aimed to promote the noble cause of blood donation and create awareness about its importance in saving precious human lives.

The camp witnessed enthusiastic participation from students and faculty members, who came forward voluntarily to contribute to this noble initiative. The atmosphere was filled with positivity, compassion, and a strong sense of social responsibility as participants expressed their willingness to donate blood and help those in need.

The initiative reflected the values of humanity, generosity, and service to society associated with the occasion. By encouraging students and

faculty members to participate in blood donation, the campus emphasized the importance of community engagement and the role of educational institutions in promoting social welfare.

The successful completion of the camp highlighted the collective efforts and commitment of the campus community towards a meaningful social cause. The active involvement of students and faculty members made the event a memorable and inspiring tribute to the legacy of Late Padma Shri Dr. D. Y. Patil Dada.

The blood donation camp concluded successfully, spreading the message that *a single act of kindness can save lives* and inspiring everyone to contribute towards building a healthier and more compassionate society.

एस. बी. पाटील पब्लिक स्कूल येथे कौशल्य बोध कार्यशाळा व मेळावा संपन्न

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट च्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूल मध्ये केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ कौशल्य शिक्षण विभाग च्या वतीने कौशल्य बोध क्षमता विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल च्या वृंदा मुलतानी जोशी, ब्लूमिंग डेल इंटरनॅशनल स्कूल चे डॉ. हितेश शर्मा यांनी मार्गदर्शन केले. यावेळी एस. बी. पाटील पब्लिक स्कूल च्या प्राचार्या डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्या पद्मावती बंडा, मुख्याध्यापिका शुभांगी कुलकर्णी व शिक्षक वर्ग आदी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर आणि कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सहभागी शिक्षकांना व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात पुण्यातील विविध शाळांमधील १०० शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षण तज्ज्ञ आदींनी सहभाग घेतला होता. यामध्ये इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी कौशल्य शिक्षणाची प्रभावी अंमलबजावणी करणे याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. या विद्यार्थ्यांनी कौशल्य मेळाव्यात वैविध्यपूर्ण प्रकल्पांचे सादरीकरण केले.

कौशल बोध या अभ्यासक्रमाची संकल्पना स्पष्ट करताना कृती आधारित व अनुभव आधारित शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये व्यावहारिक कौशल्ये, सर्जनशीलता आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करण्यावर त्यांनी विशेष भर दिला. विद्यार्थ्यांनी कार्य करणे, यंत्रे व साहित्याचा वापर आणि मानवी सेवा अशा विविध विषयांवर आधारित प्रकल्प व प्रात्यक्षिके मेळाव्यात सादर केली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, व्यावहारिक कौशल्ये, सहकार्य भावना आणि समस्या सोडविण्याची क्षमता यांची मांडणी करण्यात आली. आयोजनात विभाग समन्वयक वंदना सांगळे, प्रशासकीय व्यवस्थापक डॉ. मनीष ढेकळे, कौशल विकास कार्यशाळा प्रमुख वर्षा देशमुख यांनी सहभाग घेतला.

Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046